# आपल्या अधिकारांचे स्पष्टीकरण

जर आपल्याला **स्थानबद्ध** केलेले असेल आणि संशयिताच्या स्वरूपात आपली चौकशी केली जाणार असेल



## मुलाखतीस सुरवात करण्यापूर्वी आपल्या कोणत्या अधिकारांबाबत सांगितले गेले पाहिजे?

### 1. मुलाखती दरम्यान वकीलासोबत गोपनीय सल्ला-मसलत करण्याचा व कायदेशीर मदतीचा हक्क

A. वकील

— आपण आपल्या पसंतीच्या वकीलाला संपर्क करण्यास सांगू शकता.

— जर आपल्याजवळ आपला स्वत:चा वकील नसेल किंवा तो वकील उपस्थित राहू शकत नसेल तर आपण बार असोसिएशनच्या पूल ऑफ ड्यूटी वकीलांपैकी कुणाशी संपर्क साधायला सांगू शकता.

— जर आपण काही विशिष्ट कायदेशीर अटींचे पालन केले तर ही कायदेशीर मदत संपूर्णपणे किंवा आंशिकरित्या मोफत असेल. कायदेशीर मदतीकरीता असणाऱ्या अटी जाणून घेण्याकरीता आपण संबंधित फॉर्म मागू शकता.

B. आधीची गोपनीय सल्ला-मसलत

— पुढील मुलाखतीपूर्वी - आणि बार असोसिएशनच्या पूल ऑफ ड्यूटी वकीलाशी बोलल्यानंतर 2 तासामध्ये - आपण आपल्या वकीलाशी तीस मिनिटापर्यंत गोपनीय सल्ला-मसलत करण्यास पात्र असता, जी मुलाखतकर्त्याच्या निर्णयानुसार अपवादात्मक स्थितीमध्ये वाढवल्या जाऊ शकते.

— ही सल्ला-मसलत टेलिफोन आणि मुलाखतीच्या जागी अशा दोन्ही ठिकाणी होऊ शकते.

C. मुलाखतीदरम्यान कायदेशीर मदत

— मुलाखतीदरम्यान आपण आपल्या वकीलाची मदत घेण्यास पात्र आहात. तुमच्या वकिलाच्या उपस्थितीशिवाय चौकशी सुरू होऊ शकत नाही.

— आपले वकील खालील बाबींची खात्री करतील:

- मौन राहण्याच्या आपल्या अधिकाराचे आणि गुन्ह्यात गोवले न जाण्याच्या अधिकाराचे पालन होत आहे,
- मुलाखतीदरम्यान आपल्याशी कसा व्यवहार होत आहे, आपल्यावर कसलाही अयोग्य दबाव तर आणला जात नाही आहे,
- आपले अधिकार आणि मुलाखतीची नियमितता आपल्यावर स्पष्ट करण्यात आली आहे.

जर आपल्या वकीलाला यापैकी कुठल्याही विषयावर टिप्पणी करायची असेल तर तो ती लगेच पोलिस मुलाखत निवेदनामध्ये नोंद करू शकतो.

आपले वकील विशिष्ट विचारपूस करण्यास किंवा विशिष्ट व्यक्तीला मुलाखत घेण्यास सांगू शकतात.ते विचारल्या जाणाऱ्या प्रश्नांविषयी स्पष्टीकरण विचारू शकतात. ते तपास आणि मुलाखतीशी संबंधित आपले म्हणणे समोर मांडू शकतात. त्यांना आपल्याऐवजी उत्तर देण्याची किंवा मुलाखतीस अडथळा आणण्याची परवानगी नाही.

— आपल्याला किंवा आपल्या वकीलांना अतिरिक्त गोपनीय सल्ला-मसलत करण्यासाठी फक्त एकदा मुलाखत स्थगित करण्याचा अधिकार आहे.

जर मुलाखतीदरम्यान नवीन तथ्ये किंवा गुन्हे उघडकीस आल्यास आपल्याला आपल्या वकीलांसोबत अतिरिक्त गोपनीय सल्ला-मसलत करण्याची परवानगी आहे. ही सल्ला-मसलत 15 मिनिटांपेक्षा अधिक काळ चालू शकणार नाही.

D. सवलत

वकीलाशी सल्ला-मसलत करण्याची विनंती करणे किंवा वकीलाची मदत घेणे आपल्यावर बंधनकारक नाही.

आपण स्वेच्छेने आणि गंभीरपणे विचार करून हा अधिकार सोडू शकता, जर आपण:

— वयाने सज्ञान असाल,
— आपण या अर्थाच्या दस्तऐवजावर स्वाक्षरी करून त्यावर दिनांक नमूद केला असेल.
— शक्य असल्यास, या मुलाखतीचे दृक-श्राव्य चित्रण केले जाऊ शकते. आपण याविषयी आपल्या वकीलांशी चर्चा करू शकता.

या समस्येवर, आपण बार असोसिएशनच्या ड्युटी वकील च्या पूल येथील एखाद्याशी फोनवर बोलू शकता.

E. अपवाद

काही अपवादात्मक परिस्थितींमध्ये किंवा काही अपरिहार्य कारणांच्या आधारे, सरकारी वकील किंवा तपास करणारे दंडाधिकारी मुलाखतीच्या दरम्यान आपल्याला वकीलाशी आगाऊ गोपनीय सल्ला-मसलत करण्याचा किंवा मदत घेण्याचा अधिकार न देण्याचा निर्णय घेऊ शकतात. त्यांना या निर्णयाचे कारण सांगणे आवश्यक आहे.

## 2. गुन्ह्याचे संक्षिप्त संभाषण

– ज्या गुन्ह्यांकरीता आपली मुलाखत घेतली जात आहे त्याविषयी सांगितले जाणे हा आपला अधिकार आहे.

## 3. मौन राहण्याचा अधिकार

– कुठल्याही परिस्थितीमध्ये स्वत:ला गुन्ह्यात गोवून घेण्याकरीता आपल्यावर बळजबरी करता येणार नाही.
– आपण आपली ओळख सांगितल्यानंतर, आपण स्टेटमेंट देण्याचे, विचारलेल्या प्रश्नांना उत्तर देण्याचे किंवा मौन राहण्याचे निवडू शकता.

## 4. आपल्याला अटक झालेली आहे हे कुणाला तरी सांगणे

आपल्या अटकेबद्दल तिसऱ्या व्यक्तीला कळवण्याचा अधिकार आपल्याला आहे.

तथापि, तपासाचे हित लक्षात घेता अपरिहार्य कारणांच्या आधारे सरकारी वकील  तपास करणारे दंडाधिकारी हा भाग आवश्यक तोपर्यंत पुढे ढकलू शकतात.

## 5. वैद्यकीय मदत

— गरज भासल्यास मोफत वैद्यकीय मदत मिळण्याचा अधिकार आपल्याला आहे.
— आपण आपल्या पसंतीच्या डॉक्टरांकडून तपासणी करवून घ्यायची आहे असे सांगू शकता. असे असल्यास, याचा खर्च आपल्याला करावा लागेल.

## 6. दुभाषीची मदत आणि भाषांतराचा अधिकार

— जर आपण भाषा समजू किंवा बोलू शकत नसाल किंवा आपल्याला ऐकण्यास किंवा बोलण्यास समस्या येत असेल तर आपण एका अधिकृत दुभाषीची मदत घेण्यास आपण पात्र आहात.
  - o तुमच्या वकिलासोबत गोपनीय सल्लामसलत (तुमच्या वकिलाला तुमची भाषा समजत नसेल किंवा बोलत नसेल तर).
  - o चौकशी.

  ही मदत मोफत आहे.
— तुम्हाला कार्यवाहीची भाषा समजू शकत नसल्यास, तुम्हाला अटक वॉरंट, समन्स आणि न्यायालयाच्या निर्णयाचे संबंधित भाग तुम्हाला समजू शकतील अशा भाषेत भाषांतरित करण्याचा अधिकार आहे. हे भाषांतर मोफत आहे.
— आपल्याला आपल्या भाषेमध्ये स्वत:चे स्टेटमेंट लिहिण्यास सांगितले जाऊ शकते.

## मुलाखतीदरम्यान आपले अतिरिक्त अधिकार काय आहेत?

### 7. मुलाखती दरम्यान अतिरिक्त अधिकार

मुलाखतीची सुरवातच बऱ्याच संभाषणांनी व्हायला हवी. गुन्ह्यांबाबत पुन्हा संक्षिप्त माहिती आणि मौन राहण्याच्या आपल्या अधिकाराची माहिती देण्यासोबतच आपल्याला खालील बाबी सुद्धा सांगण्यात येतील:

— आपण अशी विनंती करू शकता की जे काही प्रश्ने विचारले जातील आणि आपण दिलेली संपूर्ण उत्तरे आपल्याच शब्दांत जशीच्या तशी रेकॉर्ड केली जावी,
— आपण विशिष्ट विचारपूस करण्यास किंवा विशिष्ट व्यक्तीला मुलाखत घेण्यास सांगू शकता,
— न्यायालयामध्ये आपल्या स्टेटमेंटला पुराव्याच्या स्वरूपात वापरले जाते.
— मुलाखतीदरम्यान, आपण आपल्या ताब्यातील दस्तऐवजांचा वापर करू शकता, जर यामुळे मुलाखत घेण्यास उशीर होत नसेल तर. आपण मुलाखतीदरम्यान किंवा त्यानंतर या कागदपत्रांना पोलिस मुलाखत निवेदनामध्ये जोडण्यास किंवा न्यायालयीन कचेरीमध्ये जमा करण्यास सांगू शकता.

### 8. मुलाखतीचे चित्रण

— शक्य असल्यास, मुलाखतीच्या कार्यवाहीचे निरीक्षण करण्याकरीता मुलाखतीचे चित्रण केले जाऊ शकते.
— याचा निर्णय मुलाखतकर्ता, सरकारी वकील किंवा तपास करणारे दंडाधिकारी घेतला जातो.

### 9. मुलाखतीच्या शेवटी

मुलाखतीच्या शेवटी मुलाखतीचा मजकूर आपणास वाचायला दिला जाईल.तो आपल्याला वाचून दाखवण्यासही आपण सांगू शकता.

असे काही आहे जे आपल्याला बदलायचे आहे किंवा काही जोडायचे आहे का असेही आपल्याला विचारले जाईल.

## आपल्याला किती काळ कैदेत ठेवले जाऊ शकते?

### 1. 48 तास

आपल्याला जास्तीत जास्त 48 तास कैदेत ठेवले जाऊ शकते.

### 2. तपास करणारा दंडाधिकारी

- 48 तासांच्या आत आपली एकतर सुटका केली जाईल किंवा आपल्याला तपास करणाऱ्या दंडाधिकाऱ्यासमोर हजर केले जाईल. आपली पोलिस कोठडी चालू ठेवायची किंवा नाही व अटक वॉरंट जारी करायचे किंवा नाही याचा निर्णय ते घेतील.

- तपास करणाऱ्या दंडाधिकाऱ्याला प्रथम प्रकरणाविषयी आपले म्हणणे ऐकून घेणे बंधनकारक आहे. या मुलाखतीदरम्यान आपण आपल्या वकीलाची मदत घेण्यास पात्र आहात. तपास करणारा दंडाधिकारी आपल्या अटकेकरीता वॉरंट जारी करण्याविषयी आपले म्हणणे किंवा आपल्या वकीलांनी समोर मांडलेला प्रतिवाद ऐकेल.

जर आपण सज्ञान वयाचे असाल तर वकीलाची मदत घेण्याचा आपला अधिकार आपण सोडू शकता.

- तपास करणाऱ्या दंडाधिकाऱ्याने जर आपल्या अटकेसाठी वॉरंट जारी केल्यास आपल्याला खालील अधिकार असतील:
  - आपण कुठल्याही मर्यादेशिवाय आपल्या वकीलाशी बोलण्यास मुक्त असाल.
  - अटक वॉरंट जारी केल्यानंतर पाच दिवसांचे आत आपल्याला सत्र न्यायालयासमोर सादर केले जाईल जेथे आपण आपल्या अटकेला आणि आपल्याला पोलिस कोठडीत ठेवण्याला आव्हान देऊ शकता.
  - सत्र न्यायालयाच्या किंवा अभियोग न्यायालयाच्या सुनावणीच्या एक दिवस आधी आपल्याला आपल्या केस फाइल विषयी सल्ला-मसलत करण्याची परवानगी असेल.
  - जर आपल्याला अटक वॉरंटचे शाब्दिक भाषांतर दिलेले नसेल व कामकाज ज्या भाषेमध्ये चालू आहे ती आपल्याला बोलता येत नसेल किंवा समजत नसेल तर आपण अटक वॉरंटच्या संबंधित परिच्छेदाचे (लिखित) भाषांतर दिले जाण्याची विनंती करू शकता. हे भाषांतर मोफत आहे.
  - आपले वकील प्रक्रियेच्या अंमलबजावणीचा पुढील भाग विस्तृत स्वरूपात समजावून सांगू शकतील.
  - जर आपण बेल्जियमचे नागरिक नसाल तर आपण आपल्या दूतावासाच्या अधिकाऱ्यांना आपल्या अटकेबद्दल कळवू शकता.

**आपल्या अधिकारांचे हे स्पष्टीकरण आपण आपल्याजवळ ठेऊ शकता.**